## प्रकरण ३ रे

## उदर - निदान समीक्षा

उदराचे रुग्ण जलोदर झाल्यावर बहुधा रुग्णालयांत प्रविष्ट होत असल्यानें पूर्वेतिहासावरून त्यांना उदर होण्याची कारणें विचारून घेणें भाग पडतें. ज्ञापक रुग्ण ती क्रमानें सांगतात. परंतु त्यामध्यें आहार विहार व निदानार्थकर व्याधि या तीन दृष्टिकोनांतून हेतु विचारून घेणे सोपें जाते.

आहार हेतु[१] - आहाराचा विचार करतांना अग्नि मंद असतां कांहीं संतर्पण होणें आवश्यक आहे. कारण उदर हा संतर्पणोत्थ[२] विकार आहे. एकाच वेळीं केलेल्या निकृष्ट प्रतीचा आहार अधिक अग्निमांद्य निर्माण करतो.

लवणरसाच्या व क्षाराच्या अतिसेवानें, लवणरस [तोयाग्नि-बाहुल्यात] बनत असल्यामुळें त्यांच्या अतिसेवनानें त्यांतील उष्ण व तीक्ष्ण गुण वाढतात व पित्त आणि रक्त यांचा प्रकोप होतो. लवणरस त्वङ्मांसाश्रय करून त्या ठिकाणीं अभिष्यंद निर्माण करतो. तेथे द्रवधातु संचय होऊन धातुंच्या दौर्बल्यामुळें क्लेदवहन होत नाहीं व शोफ निर्माण होतो, नंतर उदर होतें. हीच उपपत्ति क्षारालाहि लागू आहे.

आम्लरसांच्या अतिसेवनानें पित्त व कफ यांचा प्रकोप होतो. त्यामुळें कफज व पित्तज उदर होते.

---

१. अत्युष्ण लवणक्षार विदाह्यम्ल गदाशनात् ।
मिथ्या संसर्जनात रुक्षा विरुद्धाशुचिभोजनात् ।। च. वि. १३

२. अतिस्थौल्यापचीमेह ज्वरोदरभगंदरान् । कासंसन्यासकृच्छ्राम
कुष्ठादीनतिदारुणान् वा.सू. १४/२०.

कषाय रस वीर्यानें शीत, लघुपाकी, रुक्ष गुणात्मक असल्यानें त्याच्या अतिसेवानानें वातवृध्दि होते. हल्ली परिस्थितीमुळे कॉफी पिणे, जास्त प्रमाणांत कडधान्ये खाणे लोकांना भाग पडत आहे. त्यांच्या सेवनानें प्रकुपित झालेला वायु आमाचा व अन्नाचा मार्गावरोध करतो व त्यामुळे आहाराचे पचन होत नाहीं आणि उदरामध्यें वातसंचय होतो. रुक्ष गुणानें वातप्रकोप होऊन आध्मान निर्माण होतें आणि स्त्रोतोरोध होऊन मलसंचय होतो.

अतिउष्ण पदार्थांच्या सेवनानें उदा. गरम पेये, घाईघाईनें जेवतांना अति उष्ण पदार्थ खावे लागतात, त्यामुळे पित्तप्रकोप होतो. अतिविदाही भोजन, उष्णता व दाह निर्माण करणारे अन्न, मसालेदार पदार्थ, भेळ, भाजी, तीक्ष्ण मद्यपान वगैरेंनी पित्तप्रकोप होतो आणि अति तृष्णा निर्माण होते. त्यामुळे उदकवह स्त्रोतोदुष्टी होऊन उदर होते.

विरुध्द[१] अन्न - दूध - मासे किंवा दुधाबरोबर फळें खाणें यामुळें अन्नवह स्त्रोतसें दुष्ट होतात व परिणामीं उदर होतो.

विधिविपरीत — अष्टौ आहार विधिविशेष आयतनें लक्षातं न घेतां आहार करणें, अकाली, अशुचि, मलीन, अहित भोजन करणे यामुळें त्रिदोष प्रकोप होतो " संकीर्णाजीर्णविषमविरुध्दाध्यशनादिभि: ......व्यापन्न मद्यपानीय ....दोषत्रयकरै: तै: तै: । वा. नि. १ आणि अन्नवह स्त्रोतसें दुष्ट होतात.

संशुष्क अन्न — फुटाणे, चुरमरे वगैरे किंवा कालवणाव्यतिरिक्त अन्न खाल्यानें उदकवह स्त्रोतस दुष्ट होते. " ओष्ण्यात् आमात् भयात् पानात् । अति शुष्कान्न सेवनात् । अबुंवाहीनि दुष्यन्ति तृष्णायाश्चातिपीडनात् ।।

---

१. विस्फोटगुल्मविद्रधिशोषयक्ष्मतेजोबलस्मृतिमती किंया चित्तनाशान् । कुर्यात् विरुध्दमशनं ज्वरमस्त्रपित्तमष्टौ गदांश्च महतो विषवच्च मृत्यु ।

वा.सू. ७/२९ संग्रह सु. ९

गरविषा दूष्योदरजनक असतात. उदा. अशुध्द स्थितीतं सुवर्ण-भस्म मल्लभस्म, ताम्रभस्म सेवन करणें. दूषी विषानें रक्तदुष्टी, त्रिदोषदुष्टी होऊन दूष्योदर होतें.

व्यापन्न जलसेवनामुळें आमनिर्मिति होऊन स्त्रोतसांरोध [ उदकवह व स्वेदवह ] स्त्रोतोदुष्टी होऊन उदरनिर्मिति होते.

उदरकर सामान्य आहारासबंधी विवेचन झाले. आतां विहाराकडे पाहूं

विहार-हेतु :- १] वेगविधारण करणें हे सामान्यत: उदराचें कारण असतें. मूत्रपुरीषादींचे वेग हा येथे अपेक्षित अर्थ आहे. बहिर्गमनशील दोष शरीरांत संचित झाल्यानें ते स्त्रोतोरोध निर्माण करतात व शरीरांत कोठेतरी स्थानसंश्रय करून रहातात. अशा त-हने अपान-दुष्टी होऊन उदर निर्माण होतें.

२] कर्मविभ्रम :- म्हणजे पंचकर्मामध्यें विभ्रम होणं.... म्हणजेच पंचकर्म केल्यानंतरचे पथ्याचे नियम पाळले न जाणें. पूर्वकर्मानंतरच्यापथ्याचें नियम पाळले न गेले तरी सुध्दां उदर व्याधि निर्माण होते.

पंचकर्मचिकित्सा [ वमन, शिरोविरेचन, अनुवासन व निरूहण ] चालू असतां पथ्य न पाळणें हें उदराचें कारण आहे. उदा. विरेचन घेतल्यानंतर स्त्रोतसें रिक्त असतात. अशावेळीं एकदम गारपाणी पिणे यामुळे शैत्यानें स्त्रोतोरोध होतो. आमावस्थेतील ते पाणी वातदींची वृध्दि करते, अब्धातूचीं स्त्रोतसें दुष्ट होतात. अशावेळी विशेषत: जलोदर होते.

कांही कांही वेळां अतिसारसारखा असतां अशा त-हेनें भरपूर गार पाणी प्यायल्यानें पूर्वीचे अग्निमांद्य असतां उदर होण्याची शक्यता अधिक आहे.

पंचकर्म चिकित्सेनंतर पेया-विलेपी [ असंस्कारित व संस्कारित यूष ] अशा क्रमानें गुरु आहार देऊन अग्नि संधुक्षित करावा लागतो. तसें न केल्यास अजीर्ण होऊन, उदर निर्मिति होते.

निदानार्थकर रोग - रोगा: सर्वेऽपि मंदे ऽग्नौ .... सुतराम् उदराणि च । यावरून सर्वांत प्रथम अग्निमांद्य हे उदराचें महत्वाचें कारण आहे.

अग्निमांद्यानें अजीर्ण होऊन समता निर्माण होते, अन्नवह स्त्रोतसांची दुष्टी होते. अशावेळीं पुन: पुन: गुरु शीत वगैरे आहार सेवन करणें चालूं राहिलें तर चिरकाली ग्रहणी[१] रोग निर्माण होतो.

म्हणजे यामध्यें अन्नवह, पुरीषवह[२] व रसवह स्त्रोतसांची दुष्टी होते.

अग्निमांद्य असतां अशीच संप्राप्ति राहून पुढें मलसंचितानें " मला: मलायनानि स्यु: । या न्यायानें गुदवली दूषित होऊन अर्श विकार निर्माण होतो.

अर्श हे बद्धगुदोदराचें कारण पुढें वर्णन केलेलें आहे. [ विकल्प संप्राप्ति ] प्लीहाभिवृध्दया जठरं । जठरात् शोथ एव च । प्लीहावृध्दि हें प्लीहोदराचें कारण आहे. प्लीहावृध्दि कितीही होवो परंतु उदराला उत्सेध आला व उदरसंप्राप्ति घडून उदर व्याधी झाला तरच त्याला प्लीहोदर संज्ञा प्राप्त होते. निदानार्थकर व्याधी म्हणून उल्लेख आढळतो. रुग्णालयांत, विषमज्वर - जीर्णज्वर झाला, नंतर प्लीहा - वृध्दि झाली व नंतर प्लीहोदराचें पर्यवसान जलोदरांत झालें अशा तऱ्हेचा इतिहाससांगणारे पुष्कळ रुग्ण आढळतात.

---

१. सामं सान्नं अजीर्णं अन्ने जीर्णं पक्वं शैव ना....
चिरकृत ग्रहणीदोषा: संचयाच्चोपवेश्यते । वा.नि.८,१७,१८.

२. संधारणात् अत्यशनात् अजीर्णाध्यशनात्तथा ।
वर्चोवाहीनि दुष्यन्ति दुर्बलाग्ने: कृशस्य च। च. वि. ५/११

शोथाची सामान्य संप्राप्ति घडून नंतर त्याचें पर्यवसान उदरामध्यें उदराची संप्राप्ति घडून झालेले अथवा उदरानंतर शोथोत्पत्ति असे दोन्ही त-हेचे रुग्ण प्रत्यक्षांत दिसतात. उदा. कफवातज शोथाचे पर्यवसान - कफोदरांत होतें. [ रुग्ण सं. ४ ] अशाम्यो जाठरं दु:खं यासंबंधी वर वर्णन केले आहेच. प्राणदुष्टी व रसदुष्टी यांचा निकटवर्ती संबंध आहे. कारण दोन्ही स्त्रोतसांचे मूलस्थान उरस्थ हृदय आहे. हृद्रोगांतील वरील स्त्रोतसें उदर संप्राप्तींत विकृत झालेली असतात म्हणून हृद्रोग झाला असतां उदर होतें.

प्राणवह स्त्रोतसाचे अन्नवह स्त्रोतसाचे व पुरीषवह स्त्रोतसाचे विकार होऊन अग्निदुष्टीनें उदर होते. प्रत्यक्षामध्यें संप्राप्तीमधील स्त्रोतसांच्या विकृतीचा क्रम भिन्न भिन्न दिसून येतो. संप्राप्तीतील [ प्रत्येक रुग्णाच्या ] हा भिन्न क्रम चिकित्सेच्या धारकाव्याकरितां लक्षांत घोणें आवश्यक आहे.

शारीरिक कारणाप्रमाणेंच येथे मानसिक कारणांचा रज: तमस् दोषांचा विचार करणें आवश्यक आहे. उदर हा दोषबलाप्रवृत्त व्याधि आहे. पापकर्म करणें हा उदराचा विप्रकृष्ट हेतु आहे. तसेंच मानसक्षोम हेतुचाही मुधाम उल्लेख केलेला आहे. रज व तम दोषांमुळें मन व्याप्त झाल्यानें अन्नपचन योग्य होत नाहीं आणि वरीलप्रमाणेंच अग्निमांद्य होऊन अजीर्ण निर्माण होतें.

वर वर्णन केल्याप्रमाणें आहार, विहार व निदानार्थकर हेतु घडूनही खालील विशिष्ट अवस्था शरीरांत असणें आवश्यक आहे. सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे अग्निमांद्य निर्माण होणें. " रोगा: सर्वे पि मंदेग्नौ सुतरां उदराणि च । अग्नीच्या आधीन आहेत.

------

१. प्राणवहस्त्रोतसां हृदयं मूलं, प्राणवाहिन्यश्च धमन्य: ।
रसवह स्त्रोतसां हृदयं मूलं, रसवाहिन्यश्च धमन्य । च. वि. ५.

अग्निमंद झाल्यास प्रसादभूत अन्नरस म्हणजे रसरक्तादि धातु व उपधातुं यांची पुष्टी योग्य त-हेने होणार नाहीं. म्हणजे जाठराग्नि दुर्बल असतां प्रसादभूत रसधातूही अल्पप्रमाणांत उत्पन्न होईल. आणि मलरूप पुरीष, मूत्र, वायु अधिक प्रमाणांत निर्माण होती. धात्वाग्नि तथा पंचभूताग्नि या सर्वापेक्षा जाठराग्नि महत्वाचा आहे. कारण त्याचे वृध्दि क्षयावर अन्य अग्नींचा वृध्दिक्षय अवलंबून असतो. म्हणून जाठराग्नीचे योग्य अशा अन्नपानाशी समीधानें संरक्षण करावें लो मत लागते.

देहधातु ओज, बल, वर्ण, अग्निपोषण अन्नानें होणे हे अग्नीवरच अवलंबून आहे. अशा त-हेने दोषांची पुष्टी होऊन त्यांचा संचय व प्रकोप होण्यास कारण अग्नीचे मंदत्व आहे. अग्निमांद्य झाल्यास दोष प्रकोप होतो.

वाताचा विषमाग्नि, पित्ताचा तीक्ष्णाग्नि व कफाचा मंदाग्नि होऊन त्या त्या दोषात्मक विकार निर्माण होतात. दोषप्रकोप हे रोगाचे कारण आहे.

२

अशा त-हेने अग्निदोष हे रोगाचे कारण मानले आहे. आणि वैशिष्टयानें उदर रोगाचें कारण मानले आहे. परंतु उदर रोगाच्या उत्पत्तिमध्यें मलवृध्दि विशेषत्वानें निर्दिष्ट केली आहे यासाठी मलवृध्दीचा अर्थ समजणें आवश्यक आहे. अग्निदोष हे अ उदराचे कारण तथा अन्य

-------

" शमप्रकोपौ सर्वेषां दोषाणां अग्निसंश्रितौ ॥ " च.चि.५/१३/६.

अन्नस्य पक्ता सर्वेषां पक्तृणां अधिपो मत: ।
तन्मूलास्ते हि तद्वृध्दिक्षय: ॥
स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिता : ॥ "

२. अग्निदोषान्मनुष्याणां रोगसंघा: पृथग्विधा: ।
मलवृध्दया प्रवर्तन्ते विशेषेणोदराणि तु ॥ च.चि. १३/९.

रोगांचेकारण यामध्यें भेद आहे. इतर रोगांच्या बाबतीत अग्निदोष कारण असतां मलवृध्दि आवश्यक असते कीं नसते ? अग्निदृष्टी झाल्यानंतर रोग उत्पन्न होण्यासाठी जो काल लागतो, त्यामध्यें कांहीं काल असावा लागतो. अन्य रोग तात्काल उत्पन्न होतात. परंत उदर रोगाच्या उत्पत्तीला विलंब लागतो. हा विलंब लागण्याचे कारण आहारमल व धातुमल होय.
" मंदेग्नौ मलिनैर्भुक्ते अपाकाद् दोषसंचय: । च. चि. १३

अग्निमांद्यामुळे अन्नाचें पचन होत नाहीं. मलीन अन्न म्हणजे शुष्क पूती असात्म्य अन्न नेहेमीचें सात्म्य अन्न किंवा एकादे दिवशींचे गुरु अन्नाचें पचन करण्यापेक्षां मलीन अन्न पचविणें जास्त त्रासाचें आहे. नेहमींच्या अन्नांत शरीराला पोषक ओजस्वी द्रव्यं अधिक आणि याचे उलट मलीन, पूति, कृमि, जंतु, गददोष युक्त अशुचि अशा अन्नामध्यें शरीरवाधाकर द्रव्ये अधिक असून बल्य ओजस्वी द्रव्यं अल्पांशानें असतात. यामुळें मलद्रव्याची निर्मिती अधिक होते व संचिति अधिकाधिक वाढूं लागते. मलीन आहारा-मुळें अग्निमांद्याची अधिकता व त्यांचे चिरकृतत्व अभिप्रेत आहे.

चिरकाल अग्निदुष्टी राहिल्यानें अग्नीच्या पचनकार्यांत न्यूनता येते. तसेंच हळूहळू रसमलविभाजनाचें कार्यही शिथील होऊ लागतें. त्यामुळें स्वाभाविकच आहाररसाबरोबर मलांश-अंश अवशिष्ट रहातो, आणि फलत: आहाररस मलयुक्त होतो. रसाच्या या अवस्थेला अपक्व अवस्था म्हणतात. आहाररसापासूनच धातुरुप रस निर्माण होतो व तो पुढे सर्व धातुंचे पोषण करतो. आहाररसच अपक्व असल्यानंतर त्यापासून बनणारा रसधातु शुध्द स्वरूपांत बनणार नाहीं. अशा त-हेचे अपक्व मलधातु दोष उदर निर्मितीला कारण होतील. यातीले अपक्वतायुक्त अंशाच " मलवृध्दयां " चरकवचनाचा संकेत आहे. अपक्व आहाररस सदैव रसधातूंचे मलीन स्यांतच रुपांतर करील. उदर रोग मात्र नेहमींच होत नाही तर चिरकाली मलांशाचें आधिक्य झाल्यावरच होतो. अल्पकांत यामुळे अन्य रोगांची उत्पत्ति होते व ती उदर रोगाच्या उत्पत्तीला निदानार्थकर रोग म्हणून साहाय्यक होते.

संतर्पणोत्थ विकार म्हणून उदराचा उल्लेख केलेला आहे. परंतु प्रत्यक्षांत अग्निमांद्य असतां अतिमात्रेत लंघन व निकृष्ट प्रतीचा आहार करणें हें बहुसंख्य उदरी रुग्णामध्यें कारण मिळालें. उदररोगकर आहार, विहार व निदानार्थकर व्याधि यांचा उहापोह केला. त्याच प्रमाणे अग्निमांद्य, मलीन अन्न व मलसंचय हे उदराचे व्याधिहेतु आहेत वेगोदावर्त हा वातोदराचा, अग्निआतपसेवा हा पित्तोदराचा, आनुप मांस सेवा हा कफोदराचा याप्रमाणे विकल्प संप्राप्तींत वर्णिल्याप्रमाणें दोषहेतु आहेत.

तसेंच पंचकर्मविभ्रम, वेगविधारण, अतिपूरण हे बाह्यहेतू सांगतां येतील.

उदररोगाच्या कारणसमुदायांपैकी अग्निमांद्य हे सर्वात आद्य कारण असून बाकीची अजीर्णादि कारणें परंपरेनें, एकातून दुसरें अशी उत्पन्न होणारी आहेत.

---

१. अतिकार्श्यं भ्रमः कासस्तृष्णाऽधिक्यमरोचकः ।
स्नेहाग्नि निद्राहृक् श्रोत्र शुक्रौजः क्षुत्स्वरक्षयः । वा.सू.१४ २९,३०
वर्चोमूत्रग्रहश्चाश्च जायन्तेऽतिविलंघनात् ।

## उदर रोग निदानें

[ सामन्य ]

| आहार | विहार | निदानार्थकर रोग |
|---|---|---|
| लवणातिसेवा | वेगविधारण [मुत्रपुरीषादि ] | अजीर्ण |
| अम्लातिसेवा | पापकर्म | अग्निदोष |
| कषायातिसेवा | मन: संक्षोभ | आमदोष |
| क्षारातिसेवा | स्नेहविभ्रम | मंदाग्नि |
| उष्णातिसेवा | स्वेदविभ्रम | क ग्रहणी विकार |
| अतिविदाहीभोजनम् | वमनविभ्रम | अर्श |
| अतिविदाहीभोजनम | वमनविभ्रम | अर्श |
| अहितभोजन | विरेकविभ्रम | प्लीहा |
| मलीनाशन | शिरोविरेकविभ्रम | यकृत |
| अशुचिभोजन | अनुवासनविभ्रम | अंत्रक्षत |
| विरुध्दभोजन | निरुहण विभ्रम | अंत्रभेद |
| विधिविपरीत भोजन | अजीर्ण आस्थापन बस्ति | शोष |
| संशुष्कान्ननिषेवण | अतिस्निग्धो " " | कार्श्य |
| पूत्यन्ननिषेवण | अतिस्नेहपीते आस्थापन " | गुल्म |
| गरसंसुष्टान्ननिषेवण | | मेदोतिवृध्दि |
| वध्यादि द्रवातिपूरण | | प्रमेह |
| व्यापन्न सलिलसेवन | | हृद्रोग |
| माहेन्द्रप्रभावनदीसलिलसेवन | | कृमि |
| लूतादिविण्मूत्राविष | | उदावर्त |
| स्वेदवद्स्त्रोतस दुष्टीकारणें | | अम्लपित्त |
| उदकवद् स्त्रोतोदुष्टी कारणें | | कामला |

...३५

## उदर रोग " विशिष्ट निदानानि "

| | वातोदर | पित्तोदर | श्लेष्मोदर | सान्निपातोदर |
|---|---|---|---|---|
| १. | रूक्ष भोजन | कटुकातिसेवा | मधुरातिसेवन | दुर्बलाग्ने: |
| २. | अल्प भोजन | आम्लातिसेवा | अतिस्निग्धद्रव्यसेवन | " अपथ्यभोजन |
| ३. | आयास | लवणातिसेवा | अतिपिच्छिलद्रव्यसेवन | " आमभोजन |
| ४. | वेगोदावर्त. | उष्णातिसेवा | अतिदधिसेवन | " संयोग |
| ५. | कर्शन [लंघनादिभि:] | तीक्ष्णातिसेवा | अतिदुग्धसेवन | विरुध्दान्न " |
| | | विदाही सेवन | आनुपमांससेवन | " मात्राविरुध्द " |
| | | अध्यशन | औदकमांससेवन | " गुरुद्रव्यभोजन " |
| | | अजीर्ण | अव्यायाम | भोजने स्त्रीदत्त रजो |
| | | अग्निसेवन | दिवास्वप्न | रोम विण्मूत्रास्थि |
| | | आतपसेवन | | नखादय:[वशीकारण] |
| | | | | दुष्टजल |
| | | | | दूषीविष |
| | | | | मूंदविष |
| | | | | गरविष |
| | | | | त्रिदोषप्रकोपण. |

| प्लीहोदर [यकृतोदर] | बध्दगुदोदर | छिद्रोदर | जलोदर |
|---|---|---|---|
| १. विदाहीभोजन | उपलेपी अन्न | अन्नसंस्नष्ट शल्य -- | मंदाग्ने अत्पबुपान |
| | | १. शर्करा | क्षीणास्य " |
| २. अभिष्यंदी भोजन | अर्शोकुरै: अवरोध: | | |
| ३. अशितस्य अति- मन:संक्षोभ | उदावर्त | २. तृण | अतिकृशास्य " |
| | अंत्रासंमूर्च्छनम् | ३. काष्ट | स्नेहपीतस्य " |
| ४. अतियानसेवन | अपानेन मार्गसंरोध: | ४. अस्थि | प्रवृत्तस्नेह " |
| ५. अतिचेष्टा | | ५. कंटक | पानादे:सहसा " |
| ६. अतिमैथुन | | शल्यसंसृष्टे अंत्रो | अनुवासितस्य |
| ७. अतिभारवहन | | १. जंभा | सुशीतजलपान |
| ८. अतिअध्वगमन | | २. अत्यशन | विरिक्तस्य " |

| | | |
|---|---|---|
| ८. अतिअश्वगमन | २. अत्यशन | विरिक्तस्य " |
| ९. वमन | | वान्तस्य " |
| १०. व्याधिकर्शन | | निरूढस्य " |
| ११. रक्तातिप्रकोप | | स्नेहपीतस्य " |
| १२. रक्तदोष | | कस्य अपि उदरस्य |
| १३. कफातिप्रकोप | | उपेक्षाया. |
| १४. भेदक्षय | | |

-x-x-x-x-x-x-